PARLE MAHOTSAV

Organiser - ADV. PARAG ALAVANI, MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

कृपया प्रसिद्धीसाठी

# खासदार रावसाहेब दानवे पाटील यांच्या हस्ते पार्ले महोत्सवचे उद्‌घाटन
# ३५ स्पर्धांमधून ५० हजारपेक्षा जास्त स्पर्धक

मुंबई दि. १७: सलग अठरा वर्षे होत असलेल्या पार्ले महोत्सवाचा प्रारंभ २२ डिसेंबर पासून होत असून भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष खासदार रावसाहेब दानवे पाटील यांच्या हस्ते उदघाटन होणार आहे. तसेच भाजपा युवा मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व खासदार पूनमताई महाजन यासुद्धा उदघाटन सोहळ्यात प्रमुख अतिथी या नात्याने उपस्थित राहणार आहेत. सदर माहिती पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक आ. पराग अळवणी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून दिली.

यंदा होत असलेल्या १८ व्या पार्ले महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून ३५ स्पर्धांमधून ५० हजारपेक्षा जास्त स्पर्धक भाग घेणार आहेत. तसेच पहिल्या दिवशीच्या उदघाटन सोहळ्यानंतर दररोज विविध स्पर्धांचे बक्षिस समारंभ होणार असून २७५ प्रथम पारितोषिकं तसेच उत्तेजनार्थ धरुन सुमारे ३००० बक्षिसे बहाल करण्यात येतील अशीही माहिती आ. पराग अळवणी यांनी दिली.

दरवर्षी प्रमाणे यंदाही महोत्सव अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण ठरणार असून २३ डिसेंबर रोजी महिला कार्यकर्त्यांचे संपूर्ण आयोजन असणाऱ्या महिलांच्या सर्व स्पर्धा घेण्यात येतील. २४ डिसेंबर रोजी मॅरेथॉन, २५ डिसेंबर रोजी लायन्स क्लबच्या सहकार्याने पार्ले पश्चिम येथील मैदानावर होणाऱ्या स्पर्धांचा बक्षिस समारंभ होईल. त्यानंतर २७ डिसेंबर रोजी कला, २८ डिसेंबर रोजी क्रिडा, २९ डिसेंबर रोजी शरीर सौष्ठव तर ३० डिसेंबर रोजी सांस्कृतीक विभागाचा बक्षिस समारंभ होणार आहे. या सर्व ३२ स्पर्धा अत्यंत प्रेक्षणीय असून कला - क्रिडा रसीकांनी स्पर्धांचा आनंद घेण्यासाठी प्रेक्षक म्हणूनही यावे अशी आग्रहाची विनंती आ. पराग अळवणी यांनी केली आहे. पार्ले महोत्सवाच्या दैनंदिन माहितीसाठी www.parlemahotsav.com तसेच @parlemahotsav माध्यमातून संपर्कात रहावे असे आवाहनही त्यांनी केले.